**ठळक बातम्या**

- भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- सन २०३० पर्यंत ५० टक्के बिगरजीवाश्म इंधनाचा पर्याय स्वीकारण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याची केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांची ग्वाही
- स्पेडेक्स मोहिमेअंतर्गत पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत फिरणाऱ्या दोन उपग्रहांच्या जोडणीचा प्रयोग लांबणीवर
- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ५२८ अंकांची घसरण
  **आणि**
- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या एच एस प्रणॉय, आणि मालविका बनसोडचं आव्हान संपुष्टात

**<><><><><><>**

भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज ओदिशामध्ये भुवनेश्वर इथं १८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं औपचारिक उद्घाटन करताना बोलत होते.

**होल्ड -- बाईट -- प्रधानमंत्री**

प्रवासी भारतीय दिवस संमेलन, हा केंद्रसरकारचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम, परदेशात स्थायिक झालेल्या भारतीय समुदायाला परस्परांच्या संपर्कात येऊन संवाद साधण्यासाठी महत्त्वाचं व्यासपीठ प्रदान करतो. भारतीय समुदायाच्या

पर्यटनासाठी खास तयार करण्यात आलेल्या ‘प्रवासी भारतीय एक्स्प्रेस’ला मोदी यांनी आज हिरवा झेंडा दाखवला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाच्या समारोप समारंभाला उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्या परदेशस्थ भारतीय समुदायाच्या सदस्यांना विविध क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ‘राष्ट्रपती प्रवासी भारतीय सन्मान’ प्रदान करतील.

**<><><><><>**

नेपाळमध्ये काठमांडू इथं आज ‘प्रवासी भारतीय दिन’ साजरा करण्यात आला. नेपाळमधल्या भारतीय दूतावास आणि भारतीय नागरिक संस्थेतर्फे त्याचं आयोजन करण्यात आलं होतं . यावेळी भारतीय नागरिक संस्थेचे अध्यक्ष मनोज कांदोई यांनी नेपाळच्या प्रगतीमध्ये भारतीय नागरिकांच्या योगदानाबद्दल माहिती दिली. नेपाळमधले भारताचे राजदूत नवीन श्रीवास्तव आणि मोठ्या प्रमाणात भारतीय नागरिक यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

विविध जागतिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी आज जग भारताकडे आशेने पाहत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज दिल्लीत आयोजित जीनोमिक्स डेटा कॉन्क्लेव्हला व्हीडीओ संदेशाद्वारे संबोधित करत होते. जीनोम इंडिया प्रकल्प हा देशाच्या जैवतंत्रज्ञान विषयातला एक निर्णायक प्रकल्प असल्याचं ते म्हणाले. जैवअर्थव्यवस्था शाश्वत विकासाला गती देते आणि गेल्या १० वर्षांत देशाच्या जैवअर्थव्यवस्थेत लक्षणीय वाढ झाली आहे. २०१४ मध्ये देशाची जैवअर्थव्यवस्था १० अब्ज डॉलर्स इतकी होती, ती गेल्या आता दीडशे अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाली आहे, अशी माहिती मोदी यांनी यावेळी दिली.

भारतात कोट्यवधी लोकांना मोफत उपचार दिले जातात आणि आरोग्याच्या चांगल्या पायाभूत सुविधा विकसित केल्या जात आहेत, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

शाश्वत भविष्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनाला अनुसरून, २०३० सालापर्यंत ५० टक्के बिगर जीवाश्म इंधनाचा पर्याय स्वीकारण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत नवीकरणीय ऊर्जा या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उदघाटन सत्रात बोलत होते. भारतामध्ये नवीकरणीय ऊर्जा स्रोत विपुल प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने हरित ऊर्जा क्षेत्र आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य बनवण्यावर विशेष भर दिला जात असल्याचं ते यावेळी म्हणाले.

जगभरात हरित ऊर्जेपासून बनवलेल्या उत्पादनांची वाढती मागणी लक्षात घेता, आपल्या नवीकरणीय ऊर्जा स्रोतांचा पुरेपूर लाभ घेण्याचं भारताचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशभरात सुरू असलेल्या क्षयरोग निर्मूलन अभियानासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र लिहिलं आहे. देशातून क्षयरोगाचं समूळ उच्चाटन व्हावं यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असून या अभियानात राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनीही सहभागी व्हावं असं आवाहन या पत्रातून केंद्रानं केलं आहे.

सर्व कारागृहं तसंच सुधारगृहांमध्ये १०० दिवसांच्या या अभियानाचं आयोजन करण्याचे निर्देशही या पत्रात दिले आहेत. कारागृहांची रचना आणि त्यात

असलेली कैद्यांची संख्या यामुळे क्षयरोगाचा संसर्ग वाढण्यासाठी पूरक वातावरण तयार होतं. कैद्यांना भेटायला येणाऱ्या कुटुंबियांमार्फत मग त्याचा प्रसार होतो, त्यामुळे हे अभियान मोठ्या प्रमाणावर राबवण्याची गरज या पत्रात व्यक्त केली आहे. येत्या ३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान राज्यांचे आरोग्य विभाग, राज्य तसंच जिल्हा पातळीवरचे क्षयरोग निवारण अधिकारी यांच्या मदतीनं कारागृहांमध्ये निःक्षय शिबिराचं आयोजन करावं, तसंच २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान सर्वांना निःक्षय शपथ द्यावी, असे निर्देश दिले आहेत.

<><><><><>

भारतीय अंतराळ संशोधन संस्था -इस्रोनं स्पेडेक्स मोहिमेच्या अंतर्गत पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत फिरणाऱ्या दोन उपग्रहांचं डॉकिंग म्हणजे जोडणीचा प्रयोग लांबणीवर टाकला आहे. दोन उपग्रहांमधलं अंतर जास्त वाढल्यामुळे हा प्रयोग पुढे ढकलावा लागल्याचं इस्रोनं स्पष्ट केलं आहे. इस्रोनं यापूर्वी हा प्रयोग सात जानेवारीला घेण्याचं जाहीर केलं होतं, मात्र तेव्हाही या वाढलेल्या अंतरामुळे तो पुढे ढकलून आज घेण्याचं जाहीर करण्यात आलं होतं. आता पुढचा प्रयोग कधी होईल हे लवकरच जाहीर केलं जाईल असं इस्रोनं म्हटलं आहे.

<><><><><>

मुंबई शेअर बाजारात आज घसरणीचा जोर राहिला. शेअर बाजाराचा सेन्सेक्स ५२८ अंकांनी घसरला आणि ७७ हजार ६२० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १६२ अंकांनी घसरला आणि २३ हजार ५२६ अंकांवर बंद झाला.

बांधकाम, आणि तेल आणि वायू क्षेत्रातल्या समभागांनी आज सर्वात जास्त घसरण नोंदवली.

**<><><><><><>**

मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताचा एच. एस. प्रणॉय आणि मालविका बनसोड या दोघांचं आव्हान संपुष्टात आलं आहे. पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत चीनच्या ली शिफेंग यानं प्रणॉयवर ८-२१, २१-१५, २१-२३ असा विजय मिळवला, तर महिला एकेरीच्या प्राथमिक फेरीत चीनच्याच हान युए हिनं मालविकावर २१-१८, २१-११ अशी मात केली. महिला दुहेरीतही त्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीला प्राथमिक फेरीतच चीनच्या जोडीकडून पराभव पत्करावा लागला.

**<><><><><><>**

ऑकलंड इथं सुरू असलेल्या एएसबी क्लासिक टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भांब्री आणि फ्रेंचचा अल्बानो ऑलिवेट्टी या जोडीने पुरुष दुहेरी प्रकाराच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यांनी लॉयड ग्लासपूल आणि ज्युलियन कॅश या तिसऱ्या मानांकित ब्रिटीश जोडीचा ३-६, ६-४, १२-१० असा पराभव केला. राजीव राम आणि ख्रिश्चन हॅरिसन या अमेरिकन जोडीनेही उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सच्या सॅडियो डुम्बिया आणि फॅबियन रेबोल या जोडीचा ७-५, ६-७, १०-५ असा पराभव करून स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली आहे.

**<><><><><><>**

सरकारनं देशाला ऊर्जा आयात करणाऱ्या देशाऐवजी ऊर्जा निर्यात करणारा देश म्हणून बदललं असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते आज मध्य प्रदेशातल्या पिठमपूर इथल्या राष्ट्रीय वाहन चाचणी केंद्रानं आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

भारत आता पारंपारिक ऊर्जेच्या पर्यायाना सातत्यानं प्रोत्साहन देत असल्याचंही त्यांनी सांगितलं. ते म्हणाले की, हायड्रोजन हे भविष्यातलं इंधन असून सरकार आणि अनेक वाहन निर्माण कंपन्या त्या दिशेनं प्रयत्न करत असून देशाच्या आर्थिक विकासात वाहन निर्मिती क्षेत्राचं मोठं योगदान आहे.

**<><><><><><>**

छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात आज सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत ३ नक्षली ठार झाले. सुकमा आणि विजापूर या जिल्ह्यांच्या सीमेवरच्या जंगलात जिल्हा राखीव पोलीस दल, विशेष कृती दल आणि कोब्रा बटालियनचं संयुक्त पथक नक्षली विरोधी मोहिमेवर असताना ही चकमक सुरू झाली. बराच वेळ ही चकमक सुरु होती.

**<><><><><><>**

छोटे व्यापारी आणि सर्वसामान्य जनतेवरचा करांचा बोजा कमी करण्यासाठी वस्तू आणि सेवा कराचं  नवीन प्रारूप येत्या अर्थसंकल्पात लागू करावं अशी मागणी काँग्रेसचे सरचिटणीस सचिन पायलट यांनी केली आहे. मुंबईत गांधी भवन इथं ते आज वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><><>**

महाकुंभमेळ्याला वाहिलेली  'कुंभ वाणी' नावाची नवीन वृत्तवाहिनी आकाशवाणीतर्फे सुरु होणार असून तिचं उद्घाटन उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते उद्या होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यात नव्या 'कुंभ मंगल धून' चं  पहिलं सादरीकरण होणार आहे. कुंभ वाणी या वाहिनीवर उद्यापासून २६ फेब्रुवारीपर्यंत महाकुंभमेळ्यात होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचं प्रक्षेपण केलं जाईल. या वाहिनीवर अमृतस्नानाचं थेट प्रसारण देखील ऐकता येईल.

आकाशवाणीच्या १०३ मेगाहर्टझ लहरींवरून , 'न्यूज ऑन  ए आय आर' ॲप वरून , तसेच 'वेव्ज' या ओ टी टी मंचावरून कुंभ वाणी चं  प्रसारण ऐकता येईल.